**CNR-MHCH080004562021**

**-न्या य नि र्ण य-**

(घोषित दिनांक १८/०३/२०२६)

आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (अ) व ८३ अन्वये खटला चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेल्या पुराव्याचा विचार करता माझ्या मते खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदरील प्रत्येक मुद्दयाचा निष्कर्ष मी कारणासहीत अनुमान काढून नोंदवलेला आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दि.१३/०८/२०२० रोजी १३.३० वाजेच्या दरम्यान मौजा तोरगाव ते नान्होरी बस स्टँड ता.ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर येथे आरोपीं हे आपसात संगनमत करून देशी दारुच्या प्रत्येकी १८० मिलीच्या ४८ बाटल्या विना परवाना ताब्यात बाळगून वाहतूक करत असतांना मिळून आले व त्या परिणामी त्यांनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(अ) प्रमाणे गुन्हा केला ? | ...नाही... |
| २ | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, वरील नमूद वेळी व ठिकाणी, आरोपीं हे देशी दारुच्या प्रत्येकी १८० मिलीच्या ४८ बाटल्या विना परवाना ताब्यात बाळगून असताना मिळून आले व सदर कृती ही आयात निर्यात करण्यासाठी आरोपींनी संगनमत केले व त्या परिणामी त्यांनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ८३ प्रमाणे गुन्हा केला ? | ...नाही... |
| ३ | अंतिम आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**– कारणमीमांसा–**

३. आरोपींवरील दोष सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने केवळ एक पंच साक्षीदार तपासला आहे. परंतु सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. त्यानंतर सहायक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा पुरावा बंद केला. आरोपींविरूध्द पुरावा नसल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये बयाण वगळण्यात आले.

४. अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस. डी. हटकर यांचा तर आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. आर. सी. डांगे यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबतः–**

५. अभियोग पक्षातर्फे घटनास्थळ पंचनामा व जप्ती पत्रक सिध्द करण्यासाठी पंच सा.क्र.१ माधव बळीराम दिघोरे याला तपासले. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पोलिसांनी त्याला दि.१३.०८.२०२० रोजी पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते, तसेच त्याच्या समक्ष आरोपींच्या ताब्यातून काहीही जप्त केले नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्याची उलटतपासणी घेतली, परंतु अभियोग पक्षाला मदत होईल असा कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, आरोपींच्या ताब्यात देशी दारूच्या प्रत्येकी १८० मीलीच्या ४८ बाटल्या विना परवाना वाहतूक करतांना मिळून आल्या, याबाबतचा कुठलाही ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. प्रकरणामध्ये रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. परंतु जप्त मुद्देमाल आरोपींच्या ताब्यातून जप्त केला याबाबतचा कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे त्याचा फायदा अभियोग पक्षाला होणार नाही. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द खटला शंकेपलीकडे जाऊन सिध्द केलेला नाही. करिता मी मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ च्या उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**–आदेश–**

१. आरोपी रंजीश पुरूषोत्तम मांदाळे व प्रमोद हरिदास उईके यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(अ) व ८३ च्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. सदर खटल्यात जप्त मुद्देमाल तथाकथित देशी दारू ही अपील कालावधीनंतर नष्ट करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर यांचेकडे पाठवावी.

४. जप्त मोटार सायकल क्र.एम.एच.–४९ एम.–९४०४ ही त्याचे मुळ मालकाला परत केली नसल्यास अपील कालावधीनंतर कागदपत्रांची पडताळणी करून परत करण्यात यावी.

५. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ च्या पुर्ततेकरीता प्रत्येकी रू.१५,०००/– ची जामीन व बंधपत्र द्यावे.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.**

DNYANESHWAR BHAGWAT GUTTE

Digitally signed by DNYANESHWAR BHAGWAT GUTTE
Date: 2026.03.18 17:52:31 +0530

दिनांक १८/०३/२०२६.
ठिकाण– ब्रम्हपुरी.

**(डी. बी. गुट्टे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
ब्रम्हपुरी.